MHGA110000372015

<u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कुरखेडा यांचे न्यायालय, जिल्हा –गडचिरोली</u>

(पीठासीन अधिकारी– एन. पी. देशपांडे )

<u>नियमित दरखास्त. क्र. ०१/२०१५</u>

<u>धनको/डिक्रीधारी:–</u>

१. अ) पांडूरंग वंगणू भोयर,
रा. ईटखेडा, तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया.

ब) धनिराम वंगनू भोयर,
रा. ईटखेडा, तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया.

२) सौ. यश्वदाबाई मुकुंदा कोल्हे,
रा. माहुरकुडा, तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया.

३) सौ. अनुसयाबाई बळीराम सहारे,
रा. माहुरकुडा, तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया.

४) सौ. कलाबाई बिसन कांबळे,
रा. वडसा (जुनी), तालुका– देसाईगंज,
जिल्हा – गडचिरोली

५) हरिषचंद्र सखाराम मानकर,
रा. खामखुरा, तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया

६) सौ. मुक्ताबाई मार्कंड मेश्राम,
रा. बोळदे (करड), तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया

७) संजू रामा काळे,
रा. वडेगांव (रेल्वे), तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया

८) सुनिता रामा काळे,
रा. वडेगांव (रेल्वे), तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया

९) सरूबाई रामा काळे,
रा. वडेगांव (रेल्वे), तालुका– अर्जूनी (मोर),
जिल्हा – गोंदीया

<u>विरुध्द</u>

<u>ऋणको:–</u>

१) थानासिंग शेरसिंग उईके,
रा. नान्ही, तालुका– कुरखेडा,
जिल्हा – गडचिरोली.

२) दशरथ चत्रु नैताम,
रा. चिचटोला, तालुका– कुरखेडा,
जिल्हा – गडचिरोली.

३) दादाजी चेंडू दुमाने,
रा. बाराभाटी, तालुका– अर्जुनी(मोर),
जिल्हा – गोंदीया.

४) घनशाम चेंडू दुमाने,
रा. बाराभाटी, तालुका– अर्जुनी(मोर),
जिल्हा – गोंदीया.

५) दामू चेंडू दुमाने,
रा. बाराभाटी, तालुका– अर्जुनी(मोर),
जिल्हा – गोंदीया.

६) रामू चत्रु दुमाने ,
रा. वडेगांव, तालुका– कुरखेडा,
जिल्हा – गडचिरोली.

७) अ) सत्यभामा श्रावण नाकाडे,
ब) हेमंत श्रावण नाकाडे,
क) रेखाबाई अनिल हूपूंडी,
ऋणको क्र. ७ अ) ते ७ क) रा. आंजनटोला,
तालुका– कुरखेडा,जिल्हा – गोंदीया.
ड) वसंताबाई उमाजी गायकवाड,
रा. पुराडा, तालुका– कुरखेडा, जिल्हा – गडचिरोली.
८) ग्रामपंचायत वडेगांव तर्फे सरपंच/सचिव
ग्रा.पं. कार्यालय वडेगांव/ तालुका– कुरखेडा,
जि. गडचिरोली.

---

धनकोतर्फे विद्वान विद्वान विधीज्ञ श्री. पी.एन.बुध्दे

---

**निशाणी क्र.१९ आणि २० वरील सामाईक आदेश**

(दिनांक १२ जानेवारी, २०२६ रोजी पारीत)

१. नि.क्र.१९ व २० चे अर्जाद्वारे धनकोने ऋणको क्र. २ दशरथ चत्रु नैताम, ऋणको क्र. ३ दादाजी चेंडु दुमाने आणि ऋणको क्र. ४ घनश्याम चेंडु दुमाने यांचे कायदेशिर वारस अभिलेखावर घेण्यासाठी व त्याचे साठी झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज कथनानुसार धनकोंनी ऋणको विरूध्द दावा मिळकतीचा ताबा मिळणेसाठी प्रस्तुतचा अंमलबजावणी अर्ज दाखल केला असुन दरम्यानचे काळात ऋणको क्र. २ ते ४ यांचे निधन झाले असुन त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी व त्याचे साठी झालेला विलंब माफीसाठी दाखल केला आहे.

३. ऋणकोंचे वारसांना नोटीसा काढण्यात आल्या व हजर ऋणको क्र. १ व २ यांचे म्हणणे मागविण्यात आले परंतु त्यांनी म्हणणे दाखल केले नाही. सबब, उपरोक्त अर्ज ऋणकोंच्या म्हणण्याविना चालविण्यात येत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता धनकोने ऋणको क्र. २ दशरथ चत्रु नैताम याचे मृत्यू प्रमाणपत्र मृत्यू दिनांक

०६.०४.२०१७ ग्रामपंचायत चिखली, तालुका कुरखेडा यांनी दिनांक १५.०४.२०१७ रोजी निगर्मीत केलेले दाखल केले आहे. त्याचबरोबर ऋणको क्र. ३ दादाजी चेंडु दुमाने याचे मृत्यू प्रमाणपत्र मृत्यू दिनांक ०८.०६.२०१६ ग्रामपंचायत बाराभाटी, तालुका अजुनी मोर यांनी दिनांक १८.१२.२०२५ रोजी निगर्मीत केलेले दाखल केले आहे. परंतु, ऋणको क्र. ४ घनश्याम चेंडु दुमाने याचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. सबब, ऋणको क्र. ४ याचे निधनाबाबतचा पुरावा धनकोंनी अभिलेखावर दिला नसल्याने त्यांचे वारस अभिलेखावर घेणे व त्यासाठी विलंब माफीचा प्रश्न येत नाही.

४. अर्ज कथनाप्रमाणे मयत ऋणको क्र. २ दशरथ चत्रु नैताम याचे झनक दशरथ नैताम, धनेश दशरथ नैताम आणि अंजनाबाई नंदकुमार तुमरेटी असे वारस असुन ऋणको क्र. ३ याचे दादाजी उर्फ मारोती चेंडु दुमाने याचे यशोदा दादजी उर्फ मारोती दुमाने, राजेश दादाजी उर्फ मारोती दुमाने, देवदास दादाजी उर्फ मारोती दुमाने आणि वंदना भास्कर कांबळे असे वारस असुन ते अभिलेखावर घेण्यास झालेला उशिर माफ करून त्यांना अभिलेखावर घेण्याची परवानगी देणे न्यायोचीत राहिल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नि.क्र.१९ व २० अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. धनकोंना मयत ऋणको क्र. २ दशरथ चत्रु नैताम याचे झनक दशरथ नैताम, धनेश दशरथ नैताम आणि अंजनाबाई नंदकुमार तुमरेटी असे वारस आणि मयत ऋणको क्र. ३ याचे दादाजी उर्फ मारोती चेंडु दुमाने याचे यशोदा दादजी उर्फ मारोती दुमाने, राजेश दादाजी उर्फ मारोती दुमाने, देवदास दादाजी उर्फ मारोती दुमाने आणि वंदना भास्कर कांबळे असे वारस ते अभिलेखावर घेण्यास झालेला उशिर ऋणकोंना प्रत्येकी रक्कम रूपये ५००/– खर्च देण्याचे अधिन राहुन माफ करून त्यांना अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते आहे.

३. धनकोनी न्यायालयात विना विलंब खर्चाची रक्कम जमा करून तातडीने त्याप्रमाणे दुरूस्ती करावी व पुढील तारखेपर्यंत सुधारीत अंमलबजावणी अर्जाची प्रत दाखल करावी.

४. धनकोंनी ऋणको क्र. ४ घनश्याम चेंडु दुमाने याचे मृत्यू प्रमाणपत्र हजर करावी व त्याचे वारसाबाबत त्यानंतर अभिलेखावर घेण्याची योग्य ती कार्यवाही करावी.

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.01.14 18:18:38 +0530

(एन. पी. देशपांडे)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर,
कुरखेडा.

दि. १२.०१.२०२६